## BDP / BCA / BTS

## मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

01436

## जून, 2017

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

*सूचना : सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*
   (a) भारतीय एकात्मता
   (b) मला आवडलेले पुस्तक
   (c) माझा आवडता ऋतू
   (d) स्त्रिया म्हणजे समाजाचे आधारस्तंभ

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*
   (a) संत तुकारामांनी सज्जनांची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?
   (b) कवि अलौकिक सृष्टिचा निर्माता असतो असे केशवसुत का म्हणतात ?
   (c) मर्ढेकरांच्या कवितेचे वेगळेपण कशाकशातून दिसून येते ?
   (d) 'कातखेळ' या अरविंद गोखले यांच्या कथेतून नवकथेची कोणती वैशिष्ट्ये दिसून येतात ?

**3.** खालीलपैकी कोणत्याही *दोन* प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) ग्रामीण कथा या दृष्टीने 'वळीव' या शंकर पाटील यांच्या कथेची वैशिष्ट्ये सांगा.

(b) प्रल्हादाच्या चेलम्यावरील प्रसंगातून कोणता सामाजिक अर्थ सूचित होतो ?

(c) 'ललित निबंध' या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये सांगा.

(d) 'सांबर' या एकांकिकेतून कोणता संघर्ष प्रकट झाला आहे ?

**4.** खालीलपैकी कोणत्याही *एका* विषयावर टीपा लिहा : 6

(a) चिं.वि. जोशी यांच्या विनोदी लेखनाची वैशिष्ट्ये

(b) डॉ. आंबेडकरांचे लोकशाहीविषयक विचार

(c) बालगंधर्वांच्या गायकीची वैशिष्ट्ये

(d) लोकशाही राज्यव्यवस्थेत चांगल्या नागरिकाची लक्षणे

**5.** मराठीतील विभक्तींचे प्रत्यय सांगून 'तृतीया' आणि 'पंचमी' ह्या विभक्तींच्या एकवचनाचे प्रत्येकी एक एक उदाहरण लिहा. 5

**किंवा**

खालीलपैकी *एका* कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(a) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले

(b) अंथरूण पाहून पाय पसरावे

(c) तळे राखील तो पाणी चाखील

**6.** खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(a) पळता भुई थोडी होणे

(b) तोंडाला पाने पुसणे

(c) सोनाराने कान टोचणे

(d) साप म्हणून भुई धोपटणे

(e) जिवाचे रान करणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) शेळी जाते जिवानिशी अन् खाणारा म्हणतो वातड

(b) उथळ पाण्याला खळखळाट फार

(c) हातच्या काकणाला आरसा कशाला ?

(d) जात्यातले रडतात, सुपातले हसतात

(e) चोराच्या मनात चांदणे

**7.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(a) भाऊराव पाटिलांची 'स्वावलंबी शिक्षणा' ची संकल्पना कोणती ?

(b) स्त्री-मुक्ती चळवळीची गरज का आहे ?

(c) लोकसंख्यावाढीचे भीषण परिणाम कोणते ?

(d) पशु, पक्षी सृष्टीचे संरक्षण कसे करतात ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

Euclid was a professor of mathematics at the University of Alexandria. He was the "Father of Geometry". Though he simplified his geometry, Euclid insisted upon a thorough study of its principles, in order that his students might fully understand them. When King Ptolemy asked him "Isn't there a shorter way of learning geometry than through your method ?" "Sire," replied Euclid, "In geometry, there is no royal road to learning."

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

आज सर्व जगभर पर्यावरण रक्षणाची सर्वांना चिंता आहे. वन्यप्राणी संरक्षण हा निसर्ग संरक्षण समस्येचाच एक भाग आहे. निसर्ग हा माणसाचा मित्र आहे. त्याच्या शिवाय माणूस जगूच शकणार नाही. निसर्ग हा मातेप्रमाणे माणसाचा सांभाळ करतो. माणूस मात्र पशु, पक्षी, वनस्पती आणि जमिनीचाही नाश करीत आहे. त्याला जाणीव करून दिली पाहिजे कि पर्यावरणाचा नाश म्हणजे मानवजातीचा सर्वनाश. जंगलतोडी मुळे जमिनीची धूप होते, भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होते. जंगले वाढवा व माणूस जगवा हे आजचे ब्रीद वाक्य आहे. जंगलांमधून खाद्य, चारा, इंधन इत्यादि जीवनोपयोगी गोष्टींचा लाभ होतो. पशु-पक्षी तर पर्यावरणाचा तोल राखणारे मुख्य घटक. जीवनात माणसाने पर्यावरणपूरक गोष्टींचाच वापर करावा. सृष्टीचे संरक्षण व संवर्धन हे माणसाचेच काम आहे.

———